पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधिशसाहेब वरिष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात.

स्पे. दि. मु. नं... / २०२६

१) आसमा मैनुद्दीन इनामदार,
वय अं. ४२ वर्षे, धंदा- नोकरी
नं. १ स्वतःकरीत आणि वादी नं. ३
यांचे अज्ञान पालक कर्ता

२) कु. अरहान मैनुद्दीन इनामदार,
वय अं. १९ वर्षे, धंदा शिक्षण,

३) कु. अलजा मैनुद्दीन इनामदार,
वय अं. १५ वर्षे, धंदा- शिक्षण,
वरील सर्व रा. घर नंबर ८९३, तुळजा भवानी,
मंदिराजवळ, सुखसागरनगर, कात्रज,
पुणे-४११०४६ )…. वादी.

ORDER
Issue summons to the defendant
for appearance and filing of written statement.

Sd/-xxx
I/c.Jt. Civil Judge (Sr.D.), Pune.

विरुध्द

शगुप्ता रमजान इनामदार
वय. अ. ४२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. ८९३ तुळजा भवानी मंदिराजवळ, … प्रतिवादी.
सुखसागरनगर, कात्रज, पुणे-४११०४६

सरस निरस मानाने वाटप, ठराव व,
मनाईकरीता .

दाव्यानी आकारणी: २४,००,०००/- ^ ५/६ = २०,००,०००/-
+ १०,०००/- = २०,१०,०००/-

८२

Exh.5

पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधिशसाहेब वरिष्ठ स्तर पुणे यांचे न्यायालयात.

स्पे. दि. मु. नं...        / २०२६

आसमा मैनुद्दीन इनामदार व इतर        )…. वादी.

विरुध्द

शगुप्ता रमजान इनामदार        … प्रतिवादी.

ORDER
Perused application. Issue notice to the defendant as per Order XXXIX Rule 3 of Code of Civil Procedure.
E.P. and S.B is allowed on payment of necessary charges.

Sd/-xxx
I/c.Jt. Civil Judge (Sr.D.), Pune.

तूर्तातूर्त व निरंतर मनाईकरीता अर्ज

सदरील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितो ते येणेप्रमाणे :-

१. मिळकतीचे वर्णन :-

अ) तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली कमांक १ ते २७ यांचे हददीतील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हददीमधील गांव मौजे कात्रज सुखसागरनगर येथील जमीन सर्व्हे नंबर १३/१३अ/६४ यासी क्षेत्र ०० हे ०२ आर त्यावर बांधलेले मिळकत घर नं. ५६९/३ व ५७०/३ यासी तळमजल्यावर अंदाजे प्रत्येकी २०० चौ. फुट प्रमाणे पाच दुकाने व पहिल्या मजल्यावर चार आर. के. (रूम व कीचन) सदनिका अंदाजे प्रत्येकी ३०० चौ. फुट व दुसऱ्या मजल्यावर एक १ बी. एच. के सदनिका अंदाजे ५०० चौ. फुट व एक ३ बी. एच . के. अधिक एक रूम, एक हॉल, स्टोरेज करीत जागा अंदाजे १००० चौ. फू. , तसेच १ आर.के. (रूम व कीचन) व तिसऱ्या मजल्यावर दोन १ बी. एच. के प्रत्येकी अंदाजे ५०० चौ. फू. अशी तळमजल्यासह तीन मजली इमारत त्यातील चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

पुर्वेस :- श्री. माने यांची मिळकत
दक्षिणेस - मंदिर